# जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
## महूसल विभाग
<u>जाहिरात क्र.अ.आस्था कक्ष-१/कावि- १०७/२०१४ दिनांक १६/०५/२०१४</u>

**दिनांक : १६ मे, २०१४**

****

अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मुंबई यांचे पत्र क्रं.पदभरती/२०१३/प्र.क्र.१४७/ई-१०, दि.२९/०४/२०१४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्या आस्थापनेवरील लिपीक टंकलेखक (गट-क) संवर्गातील रिक्त पदांसाठी खाली नमूद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून लेखी परिक्षेसाठी अर्ज <u>दिनांक ३० मे, २०१४</u> पर्यंत ऑन लाईन (on line) पध्दतीने मागविण्यात येत आहे.

**लिपीक-टंकलेखक (वर्ग-३) वेतन श्रेणी PB-१ रू. ५२००-२०२०० (ग्रेड पे रु.१९००/-)**

**एकूण पदे - ७८**

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | एकुण | प्रवर्ग निहाय समांतर आरक्षण महिला ३०% | खेळाडु ५% | माजी सैनिक १५% | अशंकालीन १०% | प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त ५% | अपंग | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ.जाती | ८ | २ | ० | १ | १ | ० | **१ अंध/ क्षिणदृष्टी, १ कर्णबधीर** | ४ |
| २ | अ.जमाती | ८ | २ | ० | १ | १ | ० | | ४ |
| ३ | वि.जा.अ. | ३ | १ | ० | ० | ० | ० | | २ |
| ४ | भ.ज.ब. | ४ | १ | ० | १ | ० | ० | | २ |
| ५ | भ.ज.क. | २ | १ | ० | ० | ० | ० | | १ |
| ६ | भ.ज.ड. | ३ | १ | ० | ० | ० | ० | | २ |
| ७ | वि.मा.प्र. | २ | १ | ० | ० | ० | ० | | १ |
| ८ | इ.मा.व. | १२ | ४ | १ | २ | १ | १ | | ३ |
| ९ | खुला | ३६ | ११ | २ | ५ | ४ | २ | | १२ |
| | **एकुण** | **७८** | **२४** | **३** | **१०** | **७** | **३** | | **३१** |

टिप :- निवड झालेला अपंग उमेदवार ज्या सामाजिक आरक्षणातील असेल त्याच प्रवर्गातील सर्वसाधारण जागेमधुन त्यांना सामावून घेण्यात येईल.

**१) लिपीक टंकलेखक पदांसाठी आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता :-**

१. एस.एस.सी.(शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक राहील)

२. मराठी टंकलेखन - ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन - ४० श.प्र.मि
(टिप-ज्या उमेदवारांकडे टंकलेखन अर्हता नाही त्यांनी या प्रक्रीयेत अर्ज सादर करु नयेत)

३. शासन मान्य संस्थेचा संगणक प्रशिक्षण कोर्स (MS.CIT) नियुक्तीपासून २ वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

४. लेखी परिक्षा रविवार दिनांक ०८ जून, २०१४ रोजी बुलडाणा येथे मुख्यालयी घेण्यात येईल, परिक्षेचे तारखेत बदल झाल्यास त्याबाबतच्या सुचना कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

५. नियुक्त्या या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. तसेच जाहीरातीमध्ये उल्लेख केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे व बदल करण्याचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती यांना राहील.

६. उमेदवारांचे अर्ज ऑन लाईन (on line) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणीक पात्रतेची कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑन लाईन अर्जामध्ये पुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑन लाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रृटी राहील्यास व अर्ज

नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.

७. उमेदवाराची लेखी परिक्षा ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्याने कागदपत्रांच्या तपासणीत उमेदवारांची कागदपत्रे खोटी /अवैध आढळल्यास उमेदवाराची निवड रद्द केली जाईल.

## ३) वयोमर्यादा

१) सदर पदासाठी उमेदवारांचे वय दिनांक १७/०५/२०१४ रोजी किमान १८ वर्षे आवश्यक असून कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्षे व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्ष राहील.

२) १९९१ चे जनगणना कर्मचारी / स्वातंत्र्यसैनिकाचे पाल्य / १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी उमेदवारासाठी शासन निर्णय दिनांक ०६.१०.२०१० नुसार ४५ वर्ष वयाची अट राहील.

३) अंशकालीन उमेदवारांसाठी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २७.१०.२००९ मधील तरतूदीनूसार ४६ वर्षे वयाची अट राहील.

४) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा ४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (DCPS) लागू राहील.

### अ) खेळाडु उमेदवारांकरीता -

१) शासन निर्णय दिनांक ३०/०४/२००५ नुसार पात्र खेळाडु उमेदवार नियुक्तीसाठी पात्र राहतील.

२) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत कुटुंबातील व्यक्तींना (क्रिमीलेअर) खेळाडुंसाठी असलेले ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील, विमुक्त जाती (अ), विमाप्र, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) आणि इतर मागासवर्ग या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत खेळाडु उमेदवारांना ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

३) खेळाडु प्रमाणपत्राची सक्षम प्राधिकरणाकडून वैधता झाल्याशिवाय खेळाडू उमेदवारांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

४) खेळाडूसाठी उच्च वय मर्यादा ५ वर्षांनी शिथील राहिल.

### ब) माजी सैनिक उमेदवारांकरीता

१. माजी सैनिक प्रवर्गातून अर्ज करणा-या माजी सैनिक अर्जदारासाठी शासन शुध्दीपत्रक क्र.मासैक-२०१०/प्र.क्र./२७९/१०/१६-अ दिनांक २० ऑगस्ट, २०१० नुसार माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सबंधीत उमेदवाराच्या सशस्त्र दलातील सेवाकालावधी अधिक तीन (३ ) वर्षे इतकी राहील आणि फक्त अंपग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

१०.१०.१९८० व परिपत्रक दिनांक १६.०४.१९८१ नुसार माजी सैनिकांना वय मर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

२. शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.आरटीए/१०९०/प्र.क्र.६/९३/१२ दिनांक ८/६/९३ मधील तरतुदीनुसार माजी सैनिक उमेदवारांना माजी सैनिक या समांतर घटकांच्या आरक्षणाचा पुर्वी लाभ घेऊन शासकिय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर तो पुन्हा समांतर आरक्षाणाच्या लाभास पात्र राहणार नाही केवळ वयाची सवलत घेण्यास तो पात्र राहील.

३. माजी सैनिकांनी अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु राहणार नाही.

### क) महिला उमेदवारांकरीता, शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ नुसार.

१) इतर मागासवर्ग, विजाअ, विमाप्र, भजब, भजक आणि भजड या प्रवर्गातील व त्या त्या संवर्गातील महिला सदस्यासाठी प्रगत व्यक्ती अथवा उन्नत व्यक्ती गटातील उमेदवारांना तसेच महिलांना ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

२) शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ नुसार पुरेशा प्रमाणात महिला उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधुन महिलांसाठी राखीव असलेली पदे भरण्यात येतील.

**ड) अंशकालीन कर्मचारी उमेदवारांकरीता शासन निर्णय दि.२७/१०/२००९ नुसार**
**अंशकालीन कर्मचारी उमेदवारांकरीता शासन निर्णय दि.२७/१०/२००९ नुसार**

अर्जदार हा पदवीधर /पदवीधारक अंशकालीन कर्मचारी /उमेदवार असल्यास त्यांना शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय दिनांक २६.८.२००५ व दिनांक २७.१०.२००९ मधील तरतुदीनुसार उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल.

**ई) प्रकल्पग्रस्त भुकंपग्रस्त व अंपग प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी ४५ वर्षे वयोमर्यादा राहील त्यामुळे इतर बाबीपासून मिळणारी वयाची शिथीलता त्यांना लागु राहणार नाही.**
**प्रकल्पग्रस्त भुकंपग्रस्त व अंपग प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी ४५ वर्षे वयोमर्यादा राहील त्यामुळे इतर बाबीपासून मिळणारी वयाची शिथीलता त्यांना लागु राहणार नाही.**

**फ)** महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रं.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दिनांक ०६/१०/२०१० नुसार प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य/सन १९९१ जनगणना कर्मचारी/सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी/पदवीधर व पदवीधारक अंशकालीन कर्मचारी यांनी लिपीक टंकलेखक पदासाठी टंकलेखक परिक्षा उत्तीर्ण नसलेल्या वरील संवर्गातील उमेदवारांनी अर्ज केल्यास व सदर पदासाठी लेखी परिक्षेतुन निवड झाल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक ०६/१०/२०१० नुसार टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण करण्यासाठी ६ महिन्याची मुदत देण्यात येईल. सदर मुदतीच्या आंत सबंधीत उमेदवारास विहीत केलेली टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**ग) अपंग उमेदवारांकरीता**

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रं.आरईएन-२८९२/प्र.क्र.१२७/ई-१० दिनांक १०/७/२००८ नुसार केवळ अपंग या घटकातील (अ) अंशत: अंध म्हणजे एक डोळा चांगला असलेली व्यक्ती (ब) अस्थिव्यंग म्हणजे एका हातात किंवा पायात व्यंग असलेली व्यक्ती (क) कर्णबधीर म्हणजे बाहय उपकरणांची मदत घेऊन ऐकू शकणारी व बोलु शकणारी कर्णबधीर व्यक्तीच अर्ज करु शकतील. त्यांना अपंगत्वाचे किमान ४० टक्के प्रमाण असल्याबाबतचे सक्षम प्राधिकृत वैद्यकिय अधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे तसे अर्जात स्पष्टपणे नमुद करावे.

**४)परिक्षेचे स्वरुप -**

शासन निर्णय दिनांक १९/१०/२००७ मधील परिच्छेद क्रमांक ५ नुसार २०० गुणांची लेखी परिक्षा राहील. लिपीक टंकलेखक या संवर्गासाठी लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवण्यात आले आहे. एकुण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. जिल्हास्तरीय पदांसाठी निवड होणा-या उमेदवारांना बुलडाणा जिल्हयाचा भुगोल, सामाजिक इतिहास, व हवामान इत्यादी स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.

**५)परिक्षा शुल्क**

**प्रस्तुत भरती प्रक्रीयेसाठी खालीलप्रमाणे परिक्षा शुल्क राहील.**

| मागासवर्गीय उमेदवारांकरीता | खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता |
|---|---|
| १०० | २०० |

वरील प्रमाणे परिक्षा शुल्क हे नापरतावा राहील. परिक्षा शुल्क जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती बुलडाणा यांचे नावाने स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये चलानव्दारे बँकेत भरावे. भरती प्रक्रीयेअंतर्गत अर्ज करण्यासाठी शुल्क चलान स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेत भरता येईल.याकरीता उमेदवारास www.buldhana.nic या संकेतस्थळावर माहिती भरुन रजिस्ट्रेशन करुन

चलानची प्रींट Print घेता येईल. या संकेतस्थळावर तयार झालेले चलान उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत (State Bank Of India) भरण्यासाठी वापरावे. सदर बँकेत हे चलान भरल्यानंतर या बँकेचा Journal No. तयार होतो जो की उमेदवाराच्या चलान पोचपावतीवर बँकेमार्फत लिहुन देण्यात येतो. Journal No. टाकल्याशिवाय उमेदवारांचा अर्ज पूर्ण होत नाही त्यामुळे (State Bank Of India) यांच्या शाखेतुन हे चलान भरण्यात यावे. Journal No ची बँकेत भरलेल्या प्रत्येक रकमेच्या Journal No शी पडताळणी केली जाईल. ज्य उमेदवारांचे Journal No बँकेशी जुळतील अशा उमेदवारांनाच पात्र करण्यात येईल.

**६)शुल्का संबंधी विशेष सुचना :-**

वरील ऑन लाईन शुल्का व्यतिरिक्त डी.डी. (धनाकर्ष) धनादेश/इंडियन पोस्टल ऑर्डर इत्यादी कोणत्याही माध्यमाव्दारे शुल्क स्विकारले जाणार नाही. फक्त ऑन लाईन State Bank Of India बँकेत विहीत चलनाव्दारे भरणा केलेले शुल्कच ग्राहय धरण्यात येईल. इतर बँकेमार्फत भरलेल्या चलान Journal No मध्ये टाकल्यास पडताळणी करतेवेळेस सदर उमेदवारास अपात्र करण्यात येईल. व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही. परंतु अर्जात माजी सैनिक असा उल्लेख असणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार माजी सैनिक नसल्याचे आढळुन आल्यास अर्ज रद्द समजण्यात येईल.

**टिप :-** १.विमुक्त जाती ,भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासप्रवर्ग या प्रवर्गातील जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलीअर) मध्ये मोडतात त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा मिळत नसल्याने त्यांनी खुल्या उमेदवारांप्रमाणे परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

२. खुला महिलासांठी आरक्षीत असलेल्या पदाकरीता अर्ज करणाऱ्या .विमुक्त जाती ,भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासप्रवर्ग मधील महिला उमेदवारांपैकी जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलीअर) मोडतात त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा मिळत नसल्याने त्यांनी खुल्या उमेदवारांप्रमाणे परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**७) अर्ज कसा करावा :-**

उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार आहे. परिक्षेसाठी विहीत केलेला अर्ज www.buldhana.nic.in या संकेस्थळावर उपलब्ध होईल. त्यावर संपर्काकरीता E-mail ID तयार करणे त्यानंतर संपुर्ण नांव, जन्म दिनांक, जात इत्यादी माहिती भरल्यानंतर Login ID व Password जनरेट होईल तो सांभाळून ठेवणे त्याच बरोबर चलान जनरेट होईल. सदर चलान प्रिंट आऊट काढुन चलान बँकेत भरुन Journal No प्राप्त करुन घ्यावा. त्यानंतर आपला Login ID टाकल्यानंतर Journal No टाकणे आवश्यक राहील. त्यानंतर संपूर्ण अर्ज भरावा. संपुर्ण अर्ज भरुन झाल्यानंतर फोटो अपलोड या बटनवर क्लीक करावे. व स्कॅन केलेले स्वतःचे अद्यावत सुस्पष्ट ३.५ से.मी. x ४.५ से.मी.आकारातील JPG/GPEG/BMP या प्रकारचे व १५० KB पर्यंत फाईल साईज असलेले छायाचित्र अपलोड करावे. (छायाचित्राचा फाईल साईज १५० KB पेक्षा जास्त नसावा, त्यापेक्षा मोठी फाईल अपलोड होणार नाही ) त्यानंतर Finish बटनवर क्लीक करावे. व संपुर्ण अर्जाची प्रींट आऊट घ्यावी. सदर अर्जाची प्रिंटआऊट व चलानची प्रत स्वतःजवळ सांभाळून ठेवावी.

८)परिक्षा प्रवेश पत्र उमेदवारास www.buldhana.nic.in या संकेस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पद भरती संदर्भात सविस्तर माहिती, इतर शर्ती व अटी हया www.buldhana.nic.in या संकेस्थळावर उपलब्ध राहील. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली संपुर्ण जाहीरातीमधील सुचनांचे वाचन करुनच अर्ज सादर करावेत.

९) निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ६० दिवसाचे कालावधीनंतर प्रश्नपत्रीका व उत्तरपत्रीका नष्ट केल्या जातील.

१०) On Line फॉर्म भरण्याचा शेवटचा दिनांक ३०/०५/२०१४ (शुक्रवार) राहील. दिलेल्या तारेखनंतर संकेस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रिया काढुन टाकण्यात येईल/ बंद करण्यात येईल

११)अर्ज फक्त ऑन लाईन पध्दतीनेच स्विकारले जातील कार्यालयात प्रत्यक्ष स्वरुपात कोणतेही अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

१२) प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदरील प्रक्रियेत काही बाबी हया नमुद करावयाच्या राहील्यास किंवा अनावधनाने चुकीच्या नमुद केलेल्या असल्यास त्या प्रचलीत शासन निर्देशानुसार / निर्णयाप्रमाणे लागु राहतील.

१४) सदर प्रक्रियेबाबत काही तक्रारी असल्यास हया कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक ०७२६२/२४२४११ या क्रमांकावर सकाळी ११ ते ५.३० या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. तथापी अर्ज भरण्यासबंधी हॉल टिकीट(परिक्षा प्रवेशपत्र ) उपलब्धतेसाठी इ. तत्सम बाबीसाठी www.buldhana.nic.in संकेतस्थावर संपर्क करावा. त्याचप्रमाणे अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास ०७२६२,२४२४११ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**१५. इतर सुचना**

१. उमेदवारांना मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.

२. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी (Domicile)असला पाहीजे.

३. अर्जदाराने कागदपत्रे तपासणीच्या वेळी शाळा सोडल्याचा दाखला,शैक्षणीक पात्रतेबाबत गुणपत्रिका, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलीअर प्रमाणपत्र,( दिनांक ३१/३/२०१५ पर्यत वैध असणे आवश्यक ) असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शासकिय/निमशासकिय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी असल्याचे प्रमाणपत्र इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

४. अर्जदाराची निवड झाल्यानंतर शिफारस करण्याचे वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे व इतर आवश्यक प्रमाणपत्रे उमदेवारांनी तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. दिलेली प्रमाणपत्रे खोटी/अवैध असल्यास उमेदवार फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

५. विहीत वयोमर्यादेतील शासकिय / निमशासकिय कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत पुर्व परवानगीने भरावेत.

**ठिकाण : बुलडाणा**
**दिनांक : २७ मे, २०१४**

**जिल्हाधिकारी तथा**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,**
**बुलडाणा**